तैवान ॲथलॅटिक्स स्पर्धेत भारतीय खेळाडूंची दमदार सुरुवात...

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

तैवान ॲथलॅटिक्स ओपन २०२५ ची सुरुवात भारतीय खेळाडूंच्या उत्तम कामगिरीने झाली आहे. पहिल्याच दिवशी भारताने चार सुवर्णपदके जिंकली. पूनमने महिलांच्या १५०० मीटर शर्यतीत भारतासाठी खाते उघडले आणि ४:११.६५ वेळेसह सुवर्णपदक जिंकले. गेल्या महिन्यात, तिने दक्षिण कोरियातील गुमी येथे झालेल्या आशियाई ॲथलॅटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ४:१०.८३ वेळेसह रौप्यपदक जिंकले होते, तर ८०० मीटर शर्यतीत कांस्यपदकही जिंकले होते. भारतासाठी दुसरे यश अब्दुल्ला अबुबकरने पुरुषांच्या तिहेरी उडीत मिळवले. त्याने तिसऱ्या प्रयत्नात १६.२१ मीटर उडी मारून पहिले स्थान मिळवले आणि सुवर्णपदक जिंकले. यानंतर, स्प्रिंट अडथळा शर्यतीच्या दोन्ही स्पर्धांमध्ये भारताने सुवर्णपदके जिंकली. ज्योती याराजीने महिलांच्या १०० मीटर अडथळा शर्यतीत १२.९९ सेकंद वेळ नोंदवून विजय मिळवला. शेवटच्या अडथळापर्यंत ती दुसऱ्या स्थानावर होती; परंतु शेवटच्या क्षणी तिने दमदार कामगिरी करत कामगिरी उलथवून टाकली. तेजस शिरसेने पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत १३.५२ सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले.

...तर कोहली आपला निर्णय बदलू शकतो

नवी दिल्ली : टीम इंडियाचा अनुभवी फलंदाज विराट कोहलीने अवघ्या काही दिवसांपूर्वी कसोटी क्रिकेटला अलविदा केला. विराटने एकाएकी निर्णय घेतल्याने चाहत्यांना मोठा झटका बसला होता. मात्र ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्क याने मोठा दावा केला आहे. विराट कोहली कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीचा निर्णय बदलू शकतो, असे क्लार्कने म्हटले आहे. टीम इंडियाने इंग्लंड विरुद्धची कसोटी मालिका ०-५ अशा एकतर्फी फरकाने गमावली, तर विराट निवृत्तीचा निर्णय बदलू शकतो. विराट टेस्ट क्रिकेटवर फार प्रेम करतो. तसेच विराटचे कसोटी क्रिकेटप्रती असलेले समर्पण हे अद्भुत आहे. विराट आणि रोहित शर्मा या दोघांशिवायही भारतीय संघ चांगला आहे. या दोघांशिवायही टीम इंडिया इंग्लंड विरुद्ध जिंकू शकते, असेही क्लार्कने म्हटले आहे. दरम्यान, टीम इंडियाच्या इंग्लंड दौऱ्याला २० जूनपासून सुरुवात होणार आहे. टीम इंडिया या दौऱ्यात २० जून ते ४ ऑगस्ट दरम्यान ५ कसोटी सामने खेळणार आहे. दोन्ही संघांची ही वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२५-२०२७ या साखळीतील पहिली मालिका असणार आहे. रोहित शर्मा याच्या निवृत्तीनंतर शुभमन गिल याला भारतीय कसोटी संघाचा कर्णधार करण्यात आले आहे, तर ऋषभ पंत याच्याकडे उपकर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे.

ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार क्लार्कचे विधान

नोवाक जोकोविचचे 'स्वप्न भंग'

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

फ्रेंच ओपन २०२५ च्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत यानिक सिनरने नोवाक जोकोविचचा दारुण पराभव केला. उपांत्य फेरीत जोकोविच पूर्णपणे लयीत नसल्याचे दिसून आले. या पराभवासह नोवाच जोकोविचचे फ्रेंच ओपन २०२५ चे विजेतेपद आणि २५ वे ग्रॅण्ड स्लॅम जिंकण्याचे स्वप्न भंगले. यानिक सिनर आणि उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या कार्लोस अल्काराझ यांच्यात या स्पर्धेतील अंतिम सामना खेळला जाणार आहे. सेमीफायनल सामन्यात नोवाक जोकोविचने पहिला सेट ६-४ ने गमावला. त्यानंतर त्याने दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो अपयशी ठरला. त्याने दुसरा सेट ७-५ ने गमावला. तिसऱ्या सेटमध्ये सामना टायब्रेकरमध्ये गेला. मात्र, येथेही त्याला काही खास कामगिरी करता आली नाही आणि त्याला ७-६ ने पराभव पत्करावा लागला. नोवाक जोकोविच हा पुरुष एकेरीत सर्वाधिक २४ ग्रँड स्लॅम जिंकणारा खेळाडू आहे. पण फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत तो सिनेरला आव्हान देऊ शकला नाही. सामना गमावल्यानंतर जोकोविच निराश झाला. कदाचित फ्रेंच ओपनमधील हा त्याचा शेवटचा सामना असू शकतो, असे त्याने म्हटले. तसेच फ्रेंच ओपन २०२५ च्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात दोन सर्वोत्तम खेळाडू एकमेकांशी भिडतील. मी सिनरला अंतिम फेरीसाठी शुभेच्छा देतो. ही एक अद्भुत स्पर्धा असणार असेल, असेही तो म्हणाला.

इंग्लंडमध्ये ध्रुव जुरेलचा जलवा

कसोटीत अर्धशतकांची केली हॅटट्रिक

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

सध्या इंग्लंड लायन्स विरुद्ध इंडिय 'अ' अशी अनऑफिशियल टेस्ट मॅच सुरू आहे. या सामन्यात इंडिया 'अ' चा विकेटकीपर फलंदाज ध्रुव जुरेलने आपल्या बॅटने धावांचा पाऊस पाडला आहे. आयपीएलमधील शानदार प्रदर्शनानंतर तो इंग्लिश भूमीवर खोऱ्याने धावा कुटतोय. इंग्लंड लायन्स विरुद्ध अनऑफिशियल टेस्ट मॅचच्या पहिल्या डावामध्ये त्याने शानदार अर्धशतकी खेळी केली. याआधी त्याने पहिल्या टेस्ट मॅचच्या दोन्ही डावांत अर्धशतक झळकावले होते. ध्रुव जुरेलने इंग्लंडमध्ये अर्धशतकांची हॅटट्रिक केली आहे.

ध्रुव जुरेलने इंग्लंड लायन्स विरुद्ध दुसऱ्या अनऑफिशियल टेस्ट मॅचच्या पहिल्या दिवशी शानदार बॅटिंग केली. त्याने ८७ चेंडूत ७ चौकारांच्या मदतीने ५२ धावा केल्या. त्याने केएल राहुलसोबत (११६) तिसऱ्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी केली. याआधी जुरेलने इंग्लंड लायन्स विरुद्ध पहिल्या टेस्ट मॅचच्या पहिल्या इनिंगमध्ये १२० चेंडूंत ११ चौकार आणि एका सिक्ससह ९४ धावा फटकावल्या होत्या. इंग्लंड विरुद्ध ५ कसोटी सामन्याच्या सीरीजमध्ये ध्रुव जुरेलला टीम इंडियात दुसरा विकेटकीपर फलंदाज म्हणून निवडण्यात आले आहे.

पहिली बास्केटबॉल लीग स्पर्धा भारतात होणार

मुंबई : भारतीय खेळांच्या इतिहासात एक नवा अध्याय जोडत, एसीजी स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेडने बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडिया सोबत भागीदारीत भारतातील पहिल्या व्यावसायिक बास्केटबॉल लीगची घोषणा केली आहे. या ऐतिहासिक उपक्रमामुळे पुरुष आणि महिला दोघांसाठी ५x५ आणि ३x३ स्वरूपात संरचित स्पर्धात्मक लीग उपलब्ध होतील, ज्यामुळे देशभरातील बास्केटबॉल खेळाडूंना व्यावसायिक करिअर म्हणून पुढे जाण्याची संधी मिळेल. भारतात बास्केटबॉल खेळण्याची, पाहण्याची आणि पाठिंबा देण्याची पद्धत पूर्णपणे बदलण्यासाठी ही लीग आयोजित केली आहे. या खेळाला मर्यादित वर्गापुरते मर्यादित न ठेवता मुख्य प्रवाहातील क्रीडा श्रेणीत आणण्याचे यामागील उद्दिष्ट आहे. जागतिक बास्केटबॉल नकाशावर भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी दीर्घकालीन उत्प्रेरक ठरणार आहे.

वेचक

कर्नाटक क्रिकेट असोसिएशनच्या सचिव, कोषाध्यक्षांचा राजीनामा

नवी दिल्ली : बंगळूरुमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीनंतर वादात सापडलेल्या कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचे ए. शंकर आणि ईएस जयराम यांनी केएससीएच्या सचिव आणि कोषाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. बंगळूरुच्या आयपीएल ट्रॉफी विजयी रॅली दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीची नैतिक जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला होता. एका संयुक्त निवेदनात, शंकर आणि जयराम यांनी सांगितले की, त्यांनी गुरुवारी रात्री केएससीए अध्यक्षांना त्यांचे राजीनामे पाठवले आहेत. गेल्या दोन दिवसांतील अनपेक्षित आणि दुर्दैवी घटनांमुळे, आम्ही कळवू इच्छितो की आम्ही कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनच्या सचिव आणि कोषाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहोत, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

टोटेनहॅमकडून प्रशिक्षक पोस्टेकोग्लू यांची हकालपट्टी

नवी दिल्ली : युरोपा लीग २०२५ चे विजेतेपद जिंकल्यानंतर काही दिवसांतच टोटेनहॅम हॉटस्परने त्यांचे मुख्य प्रशिक्षक अँजे पोस्टेकोग्लू यांची हकालपट्टी केली आहे. कामगिरीचा आढावा आणि गंभीर विचारविनिमय केल्यानंतर, क्लबने निर्णय घेतला आहे की अँज पोस्टेकोग्लू यांना त्यांच्या कर्तव्यातून मुक्त केले जाईल, असे क्लबने म्हटले आहे. २२ मे रोजी, टॉटेनहॅमने मँचेस्टर युनायटेडला १-० ने हरवून युरोपा लीगचे विजेतेपद जिंकले. गेल्या १७ वर्षांतील हे क्लबचे पहिले मोठे विजेतेपद होते. या ऐतिहासिक विजयानंतरही, पोस्टेकोग्लूला क्लबमधून बाहेर पडण्याचा रस्ता दाखवण्यात आला आहे. जेतेपदाच्या विजयाच्या उलट, टोटेनहॅमची प्रीमियर लीग २०२४-२५ मध्ये कामगिरी खूपच खराब होती. क्लब लीग टेबलमध्ये १७ व्या स्थानावर राहिला आणि ३८ सामन्यांमधून फक्त ३८ गुण मिळवू शकला. संघ कसा तरी रेलीगेशनमधून वाचण्यात यशस्वी झाला होता. पोस्टेकोग्लू जेतेपद जिंकल्यानंतर म्हणाले की, मी चाहत्यांना सांगितले होते की, आम्ही जिंकणार आहोत आणि त्यांनी ते हसून उडवून दिले. पण आम्ही इथे आहोत आणि लक्षात ठेवा, सर्वोत्तम टेलिव्हिजन मालिकांचा तिसरा सीझन दुसऱ्या सीझनपेक्षा चांगला असतो.



जॉस बटलरची तुफान फटकेबाजी

इंग्लंडचा विंडीजवर २१ धावांनी विजय

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

वेस्ट इंडिज विरुद्धच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडचा फलंदाज जॉस बटलरने केलेल्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर सामना २१ धावांनी सहज जिंकला. इंग्लंडमधील चेस्टर-ल-स्ट्रीटच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात जोस बटलरने ५९ चेंडूंत ९६ धावांची वादळी खेळी केली. आंतरराष्ट्रीय टी-२० कारकिर्दीतील दुसऱ्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना तो नर्व्हस नाइंटीजचा शिकार ठरला. १०१ ही त्याची टी-२० कारकिर्दीतील सर्वोच्च धावसंख्या आहे.

वेस्ट इंडिज विरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना जेमी स्मिथच्या साथीने डकेटने इंग्लंडच्या डावाची सुरुवात केली. डकेट अवघ्या एका धावेवर तंबूत परतल्यावर जोस बटलर बॅटिंगला आला. सलामीवीर जेमी स्मिथच्या साथीनं दुसऱ्या विकेटसाठी त्याने ७९ धावांची भागीदारी रचली. तो परतल्यावर बटलरने आपली फटकेबाजी सुरूच ठेवली. तो अगदी सहज शतकाला गवसणी घालेले, असे वाटत होते. पण १९ व्या षटकातील चौथ्या चेंडूवर अल्झारी जोसेफ याने त्याला पायचीत केले. बटलरने ५९ चेंडूंत ६ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने केलेल्या ९६ धावा केल्या. त्याच्या या खेळीच्या जोरावर इंग्लंडने निर्धारित २० षटकात ६ बाद १८८ धावा केल्या होत्या. इंग्लंडने दिलेल्या १८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिज संघाने स्थिर सुरुवात केली. एविन लुईस आणि जॉन्सन चार्ल्स यांनी पहिल्या विकेटसाठी २० चेंडूंत २७ धावा जोडल्या, पण त्यानंतर वेस्ट इंडिजचा डाव डळमळीत होऊ लागला. नियमित अंतराने त्यांनी विकेट गमावल्या.

एविन लुईस वगळता, कोणताही फलंदाज विकेटवर टिकू शकला नाही आणि संघ २० षटकांत ९ गडी बाद फक्त १६७ धावाच करु शकल. वेस्ट इंडिजला २१ धावांनी सामना गमवावा लागला. दरम्यान, लियाम डॉवसनला त्याच्या शानदार गोलंदाजीसाठी सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. मालिकेतील दुसरा सामना रविवार ८ जून रोजी खेळवला जाणार आहे.

भारतीय हॉकी संघ ऑस्ट्रेलियासोबत भिडणार

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था):

अर्जेंटिनातील रोसारियो येथे झालेल्या चार देशांच्या स्पर्धेत दमदार कामगिरी केल्यानंतर भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघ आता युरोपियन दौऱ्यावर पोहोचला आहे. या दौऱ्याला ८ जूनपासून सुरुवात होणार आहे. १७ जूनपर्यंत ही स्पर्धा चालणार आहे. या स्पर्धेत संघ बेल्जियम, ऑस्ट्रेलिया आणि नेदरलँड्स विरुद्ध पाच सामने खेळणार आहे. अर्जेंटिना दौऱ्यावर, भारतीय संघाने बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध चमकदार कामगिरी केली. चिलीविरुद्ध, संघाने एक सामना २-१ असा जिंकला आणि एक सामना २-२ (२-३ शूटआउट) ने गमावला. यजमान अर्जेंटिनाविरुद्ध, संघाने एक सामना १-१ (२-० शूटआऊट) ने जिंकला आणि एक सामना २-४ असा गमावला.

त्याचप्रमाणे उरुग्वेविरुद्ध, संघाने दोन्ही सामने जिंकले (३-२ आणि २-२, ३-१ शूटआऊट). हा दौरा उच्च-दबाव परिस्थितीत आणि वेगवेगळ्या खेळण्याच्या शैलींविरुद्ध स्वतःला सिद्ध करण्याची एक उत्तम संधी ठरला. २०२५ मध्ये होणाऱ्या एफआयएच ज्युनियर महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीनेही युरोप दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. ही स्पर्धा डिसेंबर २०२५ मध्ये चिलीतील सॅटियागो येथे होणार आहे.

नीरजच्या प्रवेश यादीत जागतिक खेळाडू सामील

भालाफेकपटूंनी बंगळूरुमध्ये लक्ष वेधले

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

शुक्रवारी आयोजकांनी नीरज चोप्रा क्लासिक आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धेसाठी ऑलिंपिक आणि जागतिक १२ खेळाडूंची अंतिम प्रवेश यादी जाहीर केली. या यादीत पोलंडच्या मार्टिन कोनेक्नीने आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक विजेत्या जपानच्या गेन्की डीनची जागा घेतली आहे.

या प्रतिष्ठित स्पर्धेचे आयोजन दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेते नीरज चोप्रा आणि भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने मान्यताप्राप्त जेएसडब्ल्यू स्पोर्ट्स करत आहेत. चोप्रा यांचा ड्रीम प्रोजेक्ट मानल्या जाणाऱ्या या स्पर्धेला जागतिक ॲथलेटिक्सने श्रेणी-अ दर्जा दिला आहे.

मार्टिन कोनेक्नी व्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय खेळाडूंमध्ये दोन वेळा विश्वविजेता ग्रेनाडाचा अँडरसन पीटर्स, २०१६ ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता थॉमस रोहलर (जर्मनी), २०१५ चा विश्वविजेता ज्युलियस येगो (केनिया), कर्टिस थॉम्पसन (यूएसए), लुईझ मॉरिसियो दा सिल्वा (ब्राझील) आणि श्रीलंकेचा रुमेश पाथिरेज यांचा समावेश आहे.

ही स्पर्धा बंगळूरुमध्ये होणार
पूर्वी ही स्पर्धा पंचकुला येथे होणार होती; परंतु लाईव्ह टेलीकास्टमध्ये प्रकाश योजनेच्या अडचणींमुळे आता ती ५ जुलै रोजी बंगळूरुमधील श्री कांतीरव स्टेडियममध्ये होणार आहे.

डब्ल्यूटीसी स्पर्धेचे जेतेपद ऑस्ट्रेलिया जिंकणार?

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२०२५ स्पर्धेचा अंतिम सामना ११ जूनपासून सुरू होणार आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रिका हे संघ आमनेसामने येणार आहेत. मागच्या पर्वात ऑस्ट्रेलियाने जेतेपदावर नाव कोरले होते. त्यामुळे यंदाही जेतेपदासाठी फेवरेट मानले जात आहे. दुसरीकडे, दक्षिण अफ्रिकेला कमकुवत समजून चालणार नाही. मागच्या वर्षात दक्षिण अफ्रिकेने कसोटी क्रिकेटमध्ये आपली छाप सोडली आहे. त्यामुळे जेतेपद कोण मिळवणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली असताना ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू टॉम मूडी आणि दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्सने आपापली भाकीतं वर्तवली आहेत.

एबी डीव्हिलियर्स म्हणाला की, लॉर्ड्सवरील अंतिम सामना हा दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेटसाठी एक मोठा क्षण आहे. संपूर्ण देश आमच्या संघाच्या समर्थनात असेल आणि आशा आहे की, आम्ही यावेळी विजयाची रेषा ओलांडू शकू. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियासारखा बलाढ्य संघ समोर असला तरी आम्ही काही घाबरत नाही. मी आव्हानासाठी उत्साहीत आहे. हा एक संतुलित संघ आहे आणि मला विश्वास आहे की आपण ऑस्ट्रेलियाला हरवू शकतो. मी हे सर्व सांगत आहे कारण या अंतिम सामन्यासाठी फेवरेट आहेत.

तर टॉम मूडीने म्हटले की, ऑस्ट्रेलियाने मोठ्या स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण यश मिळवून आपली प्रतिष्ठा निर्माण केली आहे. आयसीसी स्पर्धांचा विचार केला तर, एक संघ म्हणून ऑस्ट्रेलियाची कामगिरी खूप उंचावते.

मॅग्नस कार्लसन नॉर्वे बुद्धिबळाचा ठरला विजेता

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

मॅग्नस कार्लसनने नॉर्वे बुद्धिबळ २०२५ चा किताब जिंकला आहे. विश्वविजेत्या कार्लसनने भारताचा गुकेश (१४.५) आणि इटालियन-अमेरिकन बुद्धिबळपटू फॅबियानो कारुआना (१५.५) यांना मागे टाकून हा किताब पटकवला आहे. भारताचा बुद्धिबळपटू गुकेश तिसऱ्या स्थानावर राहिला. मॅग्नस कार्लसनचे हे विक्रमी सातवे नॉर्वे बुद्धिबळ विजेतेपद आहे.

डी. गुकेशने अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाविरुद्ध निर्णायक डावात केलेली चूक त्याला महागात पडली. या विजयामुळे कारुआनाला तीन गुण मिळाले, तर पाच वेळचा जागतिक विजेता मॅग्नस कार्लसन याने १६ गुणांसह नॉर्वे चेस स्पर्धेचे सातवे विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील अंतिम डावात गुकेश सुरुवातीपासूनच अडचणीत होता. सामना वाचवण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याची वेळ संपत आली आणि एका चुकीने त्याचे सारे समीकरण बिघडले. शेवटच्या आणि अंतिम फेरीपूर्वी कार्लसन आणि गुकेश यांच्यात ०.५ गुणांचा फरक होता. पाच वेळा विश्वविजेता कार्लसनने या स्पर्धेत १६ गुणांसह विजेतेपद पटकावले.

विजयानंतर मॅग्नस कार्लसन म्हणाला की, मला खूप चांगले वाटत आहे. स्पर्धा जिंकणे हे दिलासादायक आहे. स्पर्धा खूप चढ-उतारांची होती, पण शेवटी सर्वकाही चांगले होते. भारतीय खेळाडू डी गुकेश आणि अर्जुन एरिगाईसी यांच्याबद्दल तो म्हणाला की, सर्वजण खूप चांगले खेळले. मात्र त्यांना तयारीसाठी अजूनही थोडा वेळ हवा आहे. आर्मेनियामध्ये एक स्पर्धा सुरू आहे, जिथे भारताचे आर प्रज्ञानंद आणि अरविंद चिदंबरम यांनी खूप चांगले बुद्धिबळ खेळले. गुकेशविरुद्धच्या सामन्यातील पराभवाबद्दल कार्लसन म्हणाला की, जरी ही चांगली आठवण नसली तरी सामना नेहमीच लक्षात राहील.

भारताचा गुकेश स्पर्धेत तिसऱ्या स्थानावर

बिहारमध्ये प्रथमच टेबल टेनिस स्पर्धा रंगणार

◆ पटना (वृत्तसंस्था) :

बिहारमध्ये प्रथमच, राज्य रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा १९ जून ते २२ जून दरम्यान पटना येथील पाटलीपुत्र क्रीडा संकुलाच्या इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित केली जाणार आहे. बिहार राज्य क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शंकरन यांनी शनिवारी ही माहिती दिली.

त्यांनी म्हटले की, बिहारमध्ये पहिल्यांदाच आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा क्रीडा विभाग, बिहार राज्य क्रीडा प्राधिकरण आणि बिहार टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाईल. प्रत्येक राज्यातील अव्वल खेळाडू निश्चित करण्यासाठी राज्यस्तरीय रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा आयोजित केल्या जातात. राज्य सरकार अशा खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे ज्यामध्ये राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकण्याची क्षमता आहे.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे टेबल टेनिस खेळाडू आणि पद्मश्री पुरस्कार विजेते शरद कमल यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित केली जात आहे. यामुळे राज्यातील खेळाडूंसाठी ही स्पर्धा अधिक महत्त्वाची बनते, कारण शरद कमल यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना त्यांची प्रतिभा दाखविण्याची संधी मिळणार आहे.

सर्व वयोगटातील यशस्वी आणि सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड कुशल आणि अनुभवी निवडकर्त्यांकडून केली जाईल.

एरोल मस्कने सर्वोटेक सोबत खेळला मैत्रीपूर्ण सामना

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलोन मस्क यांचे वडील एरोल मस्क यांनी त्यांच्या भारत भेटीदरम्यान सर्वोटेक स्पोर्ट्स टीमसोबत टेनिस क्रिकेट बॉलच्या मैत्रीपूर्ण सामन्यात भाग घेतला. या मनोरंजक सामन्याव्यतिरिक्त, मस्कने ड्रीम लीग ऑफ इंडियालाही आपला भक्कम पाठिंबा दिला, ही एक टेनिस क्रिकेट बॉल लीग आहे जी तळागाळातील खेळाडूंना बळ देते.

सर्वोटेक स्पोर्ट्सने मे २०२५ मध्ये ड्रीम लीग ऑफ इंडिया सुरू केली. या लीगमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना टेनिस क्रिकेट बॉल वर्ल्ड कप आणि आशिया कपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. भारत भेटीदरम्यान, एरोल मस्क यांनी केवळ क्रीडाभावना दाखवली नाही, तर देशभरातील तळागाळातील प्रतिभेला चालना देण्यासाठी काम करणाऱ्या ड्रीम लीग ऑफ इंडियाच्या उद्दिष्टाचे कौतुकही केले.

ड्रीम लीग ऑफ इंडियाबद्दल बोलताना, सर्वोटेक स्पोर्ट्सचे संचालक ऋषभ भाटिया म्हणाले की, एरोल मस्क यांचे आयोजन करणे आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट होती. त्यांनी केवळ खेळात भाग घेतला नाही तर या उपक्रमाद्वारे आम्ही ज्या विचारांना प्रोत्साहन देऊ इच्छितो ते देखील त्यांना समजले. जगभरातील क्रीडा आणि प्रतिभेचे लोकशाहीकरण करण्यासाठी असा तळागाळातील उपक्रम हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यांचे शब्द आमच्या संपूर्ण टीमसाठी प्रेरणादायी आहेत.

महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचे एकूण ३१ संघ होणार सहभागी

मुला-मुलींची राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा पुण्यात रंगणार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने आमदार सचिन अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली १८ वर्षांखालील मुले आणि मुली यांची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा पुण्यात रंगेल. शिवशक्ती महिला मंडळाच्या यजमानपदाखाली होणाऱ्या या स्पर्धेला आमदार बाबाजी काळे व बापूसाहेब पठारे यांचे सहकार्य लाभले असून १४ ते १८ जून २०२५ दरम्यान ही स्पर्धा पार पडेल. ही स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी महाराज संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे होईल. यामध्ये महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचे एकूण ३१ संघ सहभागी होणार आहेत. या निवड स्पर्धेतून निवडण्यात आलेला संघ हरिद्वार (उत्तर प्रदेश) येथे २८ जून ते ०१ जुलै २०२५ पासून होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ १४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता शिवसेना युवा नेते आमदार आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेसाठी २५ जिल्ह्यांतील सुमारे १,००० खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक सहभागी होणार असून, ९०० हून अधिक खेळाडूंसाठी सोय करण्यात आली आहे.

स्पर्धेतील सहभागी संघ

१. मुंबई शहर पूर्व, २. मुंबई शहर पश्चिम, ३. मुंबई उपनगर पूर्व, ४. मुंबई उपनगर पश्चिम, ५. ठाणे शहर, ६. ठाणे ग्रामीण, ७. रायगड, ८. रत्नागिरी, ९. सिंधुदुर्ग, १०. पुणे शहर, ११. पुणे ग्रामीण, १२. पिंपरी-चिंचवड, १३. अहमदनगर, १४. सातारा, १५. सांगली, १६. कोल्हापूर, १७. नाशिक शहर, १८. नाशिक ग्रामीण, १९. जळगाव, २०. धुळे, २१. बीड, २२. उस्मानाबाद, २३. लातूर, २४. जालना, २५. औरंगाबाद, २६. परभणी, २७. नांदेड, २८. सोलापूर, २९. हिंगोली, ३०. नंदुरबार, ३१. पालघर.

मुंबई फाल्कन्सचा ट्रायम्फ नाईट्सवर विजय

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

आयपीएलनंतर आता टी-२० मुंबई लीगचा थरार रंगला असून स्पर्धेची सुरुवात धमाकेदार झाली आहे. या लीगमध्ये भारतीय संघाचे अनेक स्टार खेळाडू खेळताना दिसून येत आहेत. या लीगमध्ये श्रेयस अय्यरचा संघ सोबो मुंबई फाल्कन्सने सूर्यकुमार यादवच्या ट्रायम्फ नाईट्सवर बाजी मारली आहे. श्रेयस अय्यरच्या संघाने हा सामना ४ विकेट्सने आपल्या नावे केला आहे. सामन्यापूर्वी सोबो मुंबई फाल्कन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना नाईट्स संघाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. जिगर सुरेंद्र राणा ७ चेंडू खेळू देखील आपले खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच वेळी, फलंदाज सिद्धांत अधातरावने एक टोक धरून हळूहळू धावसंख्या पुढे नेली. सलामीवीर सिद्धांत अधातरावला शेवटी सूर्यांश शेडगेने चांगली साथ दिली. दोघांमध्ये जवळजवळ अर्धशतकी भागीदारी झाली. सिद्धांत अधातरावने ५३ चेंडूंत ५७ धावांची खेळी साकारली, तर सूर्यांशने २१ चेंडूंत जलद ४९ धावा केल्या. यादरम्यान त्याने ३ चौकार आणि ३ षटकार मारले. कर्णधार सूर्यकुमार यादव मात्र आपल्या नाईट्ससाठी विशेष काही करू शकला नाही. तो १ धाव घेत बाद झाला. नाईट्स संघाने २० षटकांत ५ गडी गमावून १४५ धावा केल्या होत्या.

प्रहार व्यासपीठ

लग्नसोहळ्यासाठी आचारसंहिता

वैष्णवीच्या मृत्यूनंतर मराठा समाजाने ठिकठिकाणी बैठका घेऊन लग्नसोहळ्यासाठी जनजागृती मोहीम सुरू केली आहे. लग्नसोहळ्यासाठी आचारसंहिता असावी असे आवाहन करण्यात आले आहे. त्यातच हुंडा नको हा मुख्य मुद्दा आहेच. त्याचबरोबर बडेजाव न करता आटोपशीर लग्नपद्धती स्वीकारावी असे सांगण्यात येत आहे. पण शाही सोहळे साजरे करण्याची वृत्ती बनलेल्या समाजमनावर त्याचा काय परिणाम होईल का?

तुम्हाला काय वाटते...

पत्र पाठविण्याची अंतिम तारीख : रविवार (८ जून) दुपारी १२ वाजेपर्यंत. शब्दमर्यादा २०० शब्द

ई-मेल : prahaarvyaspeeth@prahaar.co.in